# ‘आयआयएम’चे उपकेंद्र पुण्यातही

## व्यावसायिकांसाठी एमबीए-डब्ल्यूपी अभ्यासक्रमाची घोषणा

**EDU गाईड**

**पुणे, ता. ७ :** व्यवस्थापन क्षेत्रातील राष्ट्रीय संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूरचे (आयआयएम) उपकेंद्र पुण्यात सुरू करण्यात आले आहे. भोसरी येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्स्पोर्टच्या (सीआयआरटी) संकुलात केंद्राची स्थापना केली असून, व्यावसायिकांसाठी एमबीए-डब्ल्यूपी या अभ्यासक्रमाची घोषणाही यावेळी करण्यात आली.

आयआयएम नागपूरच्या वतीने पत्रकार परिषदेत यासंबंधीची माहिती देण्यात आली. या वेळी आयआयएम नागपूरचे संचालक मंडळाचे अध्यक्ष सी. पी. गुरूनानी, संचालक डॉ. भीमराया मेत्री, सीआयआरटीचे संचालक डॉ. राजेंद्र सानेर पाटील आदी उपस्थित होते.

### असा आहे अभ्यासक्रम

- मास्टर्स इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन : वर्किंग प्रोफेशनल
- पात्रता : पदवीपर्यंतचे शिक्षण आणि तीन वर्षांचा अनुभव
- कालावधी : दोन वर्षे (शनिवार, रविवार)
- प्रवेश क्षमता : ६०
- प्रवेश अर्ज उपलब्ध होण्याची तारीख : ८ सप्टेंबर

**“ कार्यरत असलेल्या व्यावसायिकांना अद्ययावत व्यवस्थापन कौशल्य शिकविण्यासाठी आम्ही पुण्यात हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. लवकरच डेटा सायन्स आणि व्यवस्थापनासंबंधीचा अभ्यासक्रम सुरू करू. पुण्यातील उद्योगांच्या गरजेनुसार येथे संशोधन आणि व्यवस्थापनशास्त्रातील कुशल मनुष्यबळाची निर्मिती होईल.**

**– डॉ. भीमराया मेत्री,** संचालक, आयआयएम नागपूर